0001

## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

**वाचावे :-** १) या कार्यालयाचे दक्षता शाखेकडून दिनांक १०/१२/२०१२ रोजी प्राप्त झालेले अहवाल व त्यासोबतचे कागदपत्रे.

२) मे. पेस्ट कंट्रोल (इंडिया) प्रा.लि. यांचे वतीने ॲड. श्री. देवेंद्रनाथ श्रीकांत जोशी यांचे दिनांक ०७/१२/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदन.

३) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.७९/२०१२/जा.८८४, दिनांक ११/१२/२०१२, ०९/०१/२०१३ व १७/०१/२०१३.

४) मे. पेस्ट कंट्रोल (इंडिया) प्रा.लि. चे संचालक अनिल एस. राव, संचालक नलपुर श्रीपत राव, संचालक प्रामिला चटर्जी, असिस्टंट जनरल मॅनेजर श्रीमती श्रीकला मल्लापूर व पंढरीनाथ कृष्णा धामणकर यांचे वतीने ॲड. श्री. देवेंद्रनाथ श्रीकांत जोशी यांचे दिनांक ०८/०१/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त संयुक्त निवेदन.

५) पोलिस निरिक्षक, काशिमिरा पोलिस ठाणे, काशिमिरा यांचे दिनांक ०८/०१/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदन.

६) मे. बुनीशा केम प्रा.लि. यांचे दिनांक ०९/०१/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदन.

७) या कार्यालयाच्या दक्षता शाखेकडून दिनांक १५/०७/२०१३ रोजी प्राप्त रासायनिक पृथःकरण अहवालाची प्रत.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.७९/२०१२/जा. ८९५
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई - ४०० ०२०.
दिनांक : १० /०९ /२०१३.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES HEAD OFFICE MUMBAI

## आदेश

**(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)**

**प्रकरणाची पार्श्वभूमी :-**

दिनांक ३०/११/२०१२ रोजी या कार्यालयातील फिरत्या पथकातील अधिकारी/कर्मचारी यांनी पंचांसह मे. पेस्ट कंट्रोल (इंडिया) प्रा.लि., अे-६/१०/११, एम.आय.डी.सी. इंडस्ट्रीयल एरिया, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, दहिसर चेक नाका मागे, मिरा, जिल्हा ठाणे या ठिकाणी सॉल्वंट परवाना तपासणीकरिता १८:१५ वाजता भेट दिली. सदर कंपनीच्या कार्यालयात उपस्थित व्यक्तीस अधिकाऱ्यांनी त्यांची व पंचांची ओळख करुन देऊन भेटीचे प्रयोजन

0002 सांगितले. त्यांना त्यांचे नाव विचारले असता, त्यांनी त्यांचे नाव श्रीमती श्रीकला मल्लापूर असे सागून त्या सदर कंपनीत मागील वीस वर्षापासून असिस्टंट जनरल मॅनेजर या पदावर काम करीत असल्याचे सांगितले. अधिकाऱ्यांनी त्यांना सदर कंपनीची स्वॉल्वंट तपासणी करावयाची आहे असे सांगितले. त्याप्रमाणे श्रीमती श्रीकला मल्लापूर यांचे समवेत अधिकारी व पंच असे सर्वांनी कंपनीची तपासणी करीता श्रीमती मल्लापूर यांनी पुढील प्रमाणे कागदपत्रे दाखविली. १) ॲरोमॅक्स व एमटीओ सॉल्वंट परवाना क्र. उपभोक्ता/१४३/२००७ दिनांक १२.०१.२०१३ पर्यंत वैध. २) विस्फोटक परवाना क्र. पी/एचक्यू/एमएच/१५/१३२०/(पी ६६३७) दि. ३१.१२.२०१३ पर्यंत वैध. ३) कारखाना नोंदणी परवाना क्र. ठाणे/२(एम)(आय)३११९ (५२७५८) दिनांक ३१.१२.२०१५ पर्यंत वैध. ४) दिनांक ०१.०४.२०१२ पासूनचे सर्व प्रकारचे रॉ मटेरियल्स साठा नोंदवही-प्रमाणित नसलेली. ५) दिनांक ०१.०४.२०१२ ते ३०.११.२०१२ पर्यंतचे ॲरोमॅक्स खरेदी व वापर संगणकीय तक्ता. ६) दिनांक ०६.०६.२०११ ते ३१.११.२०१२ पर्यंतचे सॉल्वंट सी-९ खरेदी व वापर संगणकीय तक्ता व ७) ठाणे विकास आयुक्त (उद्योग) यांच्याकडील सफेद केरोसीन टोकन नं. ०१.०१.२०११-३७४४० दिनांक १३.१०.२०११ - दिनांक ३१.१२.२०१२ पर्यंत वैध असल्याचे आढळून आले.

वरील परवान्यांच्या मूळ प्रती सध्या कंपनीत उपलब्ध नसून ते दोन दिवसात आपल्या कार्यालयात सादर करु असे श्रीमती मल्लापूर यांनी अधिकाऱ्यांना पंचांसमक्ष सांगितले. अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष श्रीमती मल्लापूर यांचेकडे अधिक चौकशी केली असता, सदर कंपनीमध्ये किटकनाशके बनविण्याचा व्यवसाय चालत असून किटकनाशके बनविण्याकरिता सी-९ व ॲरोमॅक्स या सॉल्वंट पदार्थाचा वापर करण्यात येत असल्याचे सांगितले. ॲरोमॅक्स हे मेसर्स गंगा रसायनी प्रा.लि. अंकलेश्वर, गुजरात व सॉल्वंट सी-९, हेक्झीन हे बूनीशा केम प्रा.लि. तळोजा, पनवेल या कंपनीकडून खरेदी करतात. हेक्झीन पदार्थाचे मे. बुनीशा केम प्रा.लि. कंपनीमार्फत थेट बंगलोर येथील युनीटला पाठविण्यात येत असल्याचे सांगितले.

अधिकाऱ्यांनी साठा नोंदवही व संगणकीय तक्ता तपासला असता, दिनांक १०.११.२०१२ अखेर ३० लिटर्स सॉल्वंट सी-९ व दिनांक २७.११.२०१२ अखेर १३०८० लिटर्स ॲरोमॅक्सचा साठा शिल्लक असल्याची नोंद आढळली. साठापुस्तकात दिनांक १०.११.२०१२ नंतर सी-९ सॉल्वंटच्या नोंदी व दिनांक २७.११.२०१२ नंतर ॲरोमॅक्सच्या नोंदी नियमित घेण्यात आल्याचे आढळून आले नाही. अधिकाऱ्यांनी श्रीमती मल्लापूर यांचेकडे सॉल्वंट पदार्थ कोठे साठवणूक करण्यात येते याबाबत विचारणा केली असता, कंपनीत दोन २५ कि.लि. क्षमतेच्या भूमीगत टाक्या असून एका टाकीत ॲरोमॅक्स व दुसऱ्या टाकीत सफेद केरोसीनची तसेच सी-९ ची साठवणूक २०० लिटर्स क्षमतेच्या एम.एस. ड्रममध्ये करण्यात येत असल्याचे श्रीमती मल्लापूर यांनी पंचांसमक्ष सांगितले.

अधिकाऱ्यांनी भूमीगत टाक्यांचा आराखडा व कॅलीब्रेशन चार्टबाबत विचारणा केली असता, भूमीगत टाक्यांचा आराखडा उपलब्ध नसल्याचे सांगितले व ॲक्झोओमर या कंपनीने दिलेले भूमीगत टाक्यांचे कॅलीब्रेशन चार्ट पंचांसमक्ष सादर केले. दिनांक ३०.११.२०१२ रोजी कंपनीमध्ये सॉल्वंट व केरोसीनचा साठा खालीलप्रमाणे शिल्लक असल्याचे श्रीमती मल्लापूर यांनी सांगितले.

| अ.क्र. | सॉल्वंटचा प्रकार / द्रवपदार्थ | शिल्लक साठा |
|---|---|---|
| १ | ॲरोमॅक्स | १२२८५ लिटर्स |
| २. | सफेद केरोसीन | २३४० लिटर्स |
| ३. | सी-९ | निरंक |

उपरोक्त आढळून आलेल्या सफेद केरोसीन साठयाबाबत महाराष्ट्र फ्रिसेल केरोसीन डिलर्स ॲण्ड रिसेलर (लायसेंसिंग) ऑर्डर, २००५ नुसार केरोसीन खरेदी, साठवणूक व वापर करिता नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांच्या कार्यालयातून परवाना घेतला आहे किंवा कसे ? याबाबत श्रीमती मल्लापूर यांचेकडे चौकशी केली असता, केरोसीन परवाना घेतला नसल्याचे सांगून, ठाणे विकास आयुक्त (उद्योग) यांच्याकडून घेतलेल्या परवान्याची प्रत सादर केली. अधिकाऱ्यांनी श्रीमती मल्लापूर यांना सफेद केरोसीनची खरेदी बिले सादर करण्यास सांगितले असता, कंपनीमध्ये केरोसीन बिले उपलब्ध नसल्याचे श्रीमती मल्लापुर यांनी सागितले.

अधिकाऱ्यांनी साठा नोंदवही तसेच साठा संगणकीय तक्ता तपासला असता, मे. बुनीशा केम प्रा.लि. या कंपनीकडून दिनांक २५.०७.२०११ रोजी १०३२ लिटर्स, दिनांक २९.०८.२०११ रोजी १७२० लिटर्स, दिनांक ०३.०९.२०११ रोजी १७२० लिटर्स, दिनांक १७.१०..२०११ रोजी २५८० लिटर्स, दिनांक १०.११.२०११ रोजी २५८० लिटर्स, दिनांक १०.०१.२०१२ रोजी १७२० लिटर्स, दिनांक २५.०१.२०१२ रोजी १७२० लिटर्स, दिनांक २८.०३.२०१२ रोजी १७२० लिटर्स, दिनांक १०.०४.२०१२ रोजी १७२० लिटर्स, दिनांक २६.०४.२०१२ रोजी १७२० लिटर्स, दिनांक ०२.०७.२०१२ रोजी १०३० लिटर्स, दिनांक ०७.०७.२०१२ रोजी २२३६ लिटर्स, दिनांक ०९.०८.२०१२ रोजी १२०४ लिटर्स, दिनांक १०.०९.२०१२ रोजी १७२० लिटर्स व दिनांक १६.१०.२०१२ रोजी १७२० लिटर्स सॉल्वंट सी-९ या पदार्थाचे खरेदी केल्याचे आढळून आले. तसेच मे. गंगा रसायनी या कंपनीकडून दिनांक १७.१०.२०१२ रोजी १६१९० लिटर्स ॲरोमॅक्सची खरेदी केल्याचे आढळून आले. अधिकाऱ्यांनी श्रीमती मल्लापूर यांना सी-९ व ॲरोमॅक्स या सॉल्वंटची खरेदी बिले सादर करण्याची सूचना केली असता, खरेदी बिले कंपनीचे कॉर्पोरेट ऑफिस जगदंबा हाऊस, गोरेगांव (पूर्व) या ठिकाणी असल्याचे श्रीमती मल्लापूर यांनी पंचांसमक्ष सांगितले.

0004 जिल्हा पुरवठा अधिकारी रायगड, अलिबाग यांनी नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा; मुंबई यांचे कार्यालयात सादर केलेले पत्र क्र. पुरवठा/कात/१२/अंउप्र/२०१२ दिनांक ०६.०२.२०१२ रोजीच्या पत्रात मेसर्स बुनिशा केम प्रा.लि. तळोजा, तालुका - पनवेल, जिल्हा-रायगड यांनी मं. पेस्ट कंट्रोल(इंडिया) प्रा.लि. या कंपनीस दिनांक ०१.१०.२०११ ते दिनांक ३१.१२.२०११ या कालावधीत हेक्झीन ३२०० लिटर्स व सी-९ ५१६० लिटर्स सॉल्वंट पदार्थाची विक्री केल्याचे दर्शविले आहे व याबाबतचे एंड युझ सर्टिफिकेट इकडील कार्यालयात सादर केलेले आहे. सदर पत्रात नमूद सॉल्वंट साठा तसेच साठा नोंदवहीतील साठा, संगणकीय तक्त्यात नमूद साठयाबाबत सॉल्वंट परवाना आपल्या कंपनीने घेतला आहे, याबाबत श्रीमती मल्लापूर यांचेकडे चौकशी केली असता, त्यांनी ॲरोमॅक्स व एमटीओ या पदार्थाकरिता नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे कार्यालयातून घेतलेला सॉल्वंट परवाना क्र. उपभोक्ता/१४३/२००७ दिनांक १२.०१.२०१३ पर्यंत वैध असलेल्या परवान्याची छायांकित प्रत सादर केली. सदर सॉल्वंट परवान्याची छायांकित प्रत पडताळली असता, सदर परवान्यात सॉल्वंट सी-९ व हेक्झीन या पदार्थाची नोंद आढळली नाही. अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष श्रीमती मल्लापूर यांचेकडे सॉल्वंट सी-९ व हेक्झीन करिता परवाना घेतला आहे का ? याबाबत चौकशी केली असता, सॉल्वंट सी-९ व हेक्झीन या पदार्थाच्या खरेदी, साठवणूक व वापराकरिता परवाना घेणे आवश्यक असते याबाबतची माहिती कंपनीस नसल्याने सॉल्वंट सी-९ व हेक्झीन याकरिता परवाना घेतला नसल्याचे सांगितले. वरीलप्रमाणे श्रीमती मल्लापूर यांचा लेखी जबाब नोंदविण्यात आला. कंपनीने महाराष्ट्र फ्रिसेल केरोसीन डिलर्स ॲण्ड रिसेलर (लायसेंसिंग) ऑर्डर २००५ नुसार केरोसीन खरेदी, साठवणूक व वापराकरिता केरोसीन परवाना घेतला नसल्याने खालील नमूद सफेद केरोसीन तसेच सॉल्वंट सदृश ॲरोमॅक्स साठ्याबाबत साशंकता वाटत असल्याने सदरचा साठा जागीच जप्त करुन सीलबंद करण्यात आला.

| अ.क्र. | साठवणूकीचा तपशील | साठा (लिटर्स) | अंदाजे किंमत |
|---|---|---|---|
| १. | भूमीगत टाकी व दोन ड्रममधील सफेद केरोसीन साठा. | २३४० | १,२८,७००/- |
| २ | भूमीगत टाकी व एक ड्रममधील ॲरोमॅक्स सदृश पदार्थाचा साठा. | १२२८५ | १०,४४,२२५/- |
| | एकूण | | ११,७२,९२५/- |

कंपनीत आढळून आलेल्या केरोसीनचे व सॉल्वंट सदृश पदार्थाचे रासायनिक पृथ:करणाकरिता नमूने घेण्यात आले.

श्रीमती मल्लापूर यांनी दिनांक ०१.१०.२०१२ रोजी सकाळी ११.३० च्या सुमारास माहे एप्रिल २०१२ पासून खरेदी केलेल्या सॉल्वंट सी-९, ॲरोमॅक्स व सफेद केरोसीनची बिले तपासणीकरिता सादर केली. सादर केलेल्या सी-

0005 व ॲरोमॅक्स खरेदी बिलांची साठेनोंदवहीतील पडताळणी केली असता, नोंदी बरोबर असल्याच्या आढळल्या. परंतु इंडियन ऑईल कॉर्पोरेशनकडून सफेद केरोसीन खरेदी केलेल्या बिलांची नोंदवहीनुसार पडताळणी केली असता खालीलप्रमाणे तफावत आढळली.

| अ.क्र. | दिनांक | बिल क्रमांक | बिलावरील साठा | साठेवहीतील साठा | तफावत |
|---|---|---|---|---|---|
| १ | ०९.०४.२०१२ | ६५३६९४६९३ | २०००० | २०००० | निरंक |
| २ | १६.०५.२०१२ | ६५४५३५९६० | २०००० | २०००० | निरंक |
| ३ | १३.०६.२०१२ | ६५५१५३५६४ | २०००० | २०००० | निरंक |
| ४ | १४.०७.२०१२ | ६५५८४०५८८ | १८००० | २३०७६ | ५०७६ |
| ५ | ०७.०८.२०१२ | ६५६३४१०९२ | १८००० | २३०७६ | ५०७६ |
| ६ | ०८.०९.२०१२ | ६५६९८४७७१ | १८००० | १८००० | निरंक |
| ७ | १२.१०.२०१२ | ६५७६६८१६३ | १८००० | १८००० | निरंक |
| ८ | ०८.११.२०१२ | ६५८२६७८०५ | १८००० | १८००० | निरंक |

अधिकाऱ्यांनी साठा नोंदवहीत खरेदी, वापर व शिल्लक नोंदी घेणारे कंपनीचे कर्मचारी पंढरीनाथ कृष्णा धामणकर यांच्याकडे साठेनोंदवहीतील केरोसीन खरेदी नोंदीबाबत व नोंदीतील तफावतीबाबत विचारणा केली असता, पंढरीनाथ कृष्णा धामणकर यांनी बिल क्र. ६५५८४०५८८ व ६५६३४१०९२ नुसार प्रत्येकी १८००० लिटर्स केरोसीन खरेदी साठ्याची साठावहीत नोंद घेताना लिटर्सचे किलोग्रॅम रुपांतर करुन साठयाची नोंद साठानोंदवहीत घेतली असल्याचे सांगितले. उर्वरित खरेदी, वापर व शिल्लक नोंदी लिटर्समध्ये घेण्यात आल्याचे सांगितले. वरीलबाबत धामणकर यांचा लेखी जबाब नोंदविण्यात आला.

अशाप्रकारे खरेदी बिलानुसार केरोसीन साठा व साठानोंदवहीतील दर्शविलेला खरेदी साठा यामध्ये असलेल्या तफावतीबाबत सादर केलेला खुलासा पथकास समर्पक वाटला नाही. कंपनीने व कंपनीच्या संचालक मंडळाने साठे नोंदवहीनुसार खरेदी केलेल्या केरोसीन साठयाची परिपूर्ण बिले सादर केली नाहीत. म्हणजेच १०१५२ लिटर्स केरोसीन अवैधमार्गाने विना खरेदी बिलाने संपादन करुन वापर केल्याचे सकृतदर्शनी दिसून आले. कंपनीच्या संचालक मंडळाने व कंपनीने तपासणीवेळी मूळ परवाने व परिपूर्ण सॉल्व्हंट व केरोसीन बिले सादर केली नाहीत. प्रमाणित सॉल्व्हंट साठा नोंदवही ठेवलेली नाही. सादर केलेल्या साठा नोंदवहीतील सॉल्व्हंट व केरोसीनच्या नोंदी दिनांक ३०.११.२०१२ पर्यंत अद्यावत केलेल्या नाहीत. साठा नोंदवहीतील शिल्लक सॉल्व्हंट सी-९ ,ॲरोमॅक्स व केरोसीन साठा व प्रत्यक्ष साठयात तफावत आढळून आली. वरीलबाबत कंपनीने योग्य खुलासा सादर केलेला नाही. पेस्ट कंट्रोल (इंडिया) प्रा.लि. या कंपनीने व संचालक मंडळाने महाराष्ट्र फ्रिसेल केरोसीन डिलर्स ॲण्ड रिसेलर (लायसेंसिंग) ऑर्डर २००५ अन्वये अनुज्ञाप्तीशिवाय केरोसीन खरेदी, साठवणूक व वापर केलेला असल्याने तसेच

0006 महाराष्ट्र सॉल्वंट रेफिनेट व स्लॉप (अनुज्ञापन) आदेश २००७ अन्वये अनुज्ञप्ती शिवाय सॉल्वंट सी-९ व हेक्झीनची खरेदी, साठवणूक व वापर केला असल्याचे तपासणीत आढळून आले.

सदर कारवाईच्या दरम्यान अधिकाऱ्यांनी काशिमिरा पोलीस ठाण्याशी संपर्क साधून घटनेची माहिती दिली. सदर पोलीस ठाण्याचे पोलीस शिपाई श्री. अविनाश सुरेश काळोखे, बक्कल क्र. ३३३२ व पोलीस शिपाई आर. पु. नागरगोजे, बक्कल क्र. २८०२ हे घटनास्थळी हजर झाले व त्यांच्यासमक्ष जप्त मुद्देमाल असलेल्या भूमीगत टकीस व ड्रमना सिलबंद करुन पोलीसांच्या ताब्यात देण्यात आला.

अशाप्रकारे मे. बुनीशा केम प्रा.लि. तळोजा, ता-पनवेल,जिल्हा- रायगड यांनी मे. पेस्ट कंट्रोल (इंडिया) प्रा.लि. यांना सॉल्वंट सी-९ व हेक्झीन करितां अनुज्ञप्ती घेतलेली नसताना सॉल्वंटचा पुरवठा केला असल्याचे तपासणीत आढळून आल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द १) जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८, ९ व १०, २) महाराष्ट्र फ्रिसेल केरोसीन डिलर्स ॲण्ड रिसेलर (लायसेंसिंग) ऑर्डर २००५, ३) महाराष्ट्र सॉल्वंट रेफिनेट व स्लॉप (अनुज्ञापन) आदेश २००७ चे कलम ३ चा भंग केल्यावरुन त्यांचेविरुध्द काशिमिरा पोलिस ठाणे, काशिमिरा, जिल्हा ठाणे येथे गुन्हा नोंद क्र. II ८८/२०१२, दिनांक ०१/१२/२०१२ अन्वये गुन्हा नोंद करुन वरील मुद्देमाल जप्त करण्यात आला.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप (अंमलबजावणी), मुंबई यांनी वाचावे क्र. १ अन्वये केलेली असून जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. ३ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दिनांक ०८/०१/२०१३ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक ०८/०१/२०१३ रोजीची सुनावणी प्रशासकिय कारणास्तव रद्द करण्यात आली. तथापी, सदर सुनावणीचे दिवशी ॲड. श्री डी.एस. जोशी हे वकालतनाम्यासह मे. पेस्ट कंट्रोल (इंडिया) प्रा.लि. व कंपनीचे इतर प्रतिनिधी यांचे वतीने उपस्थित राहिले. तपासी पोलिस अधिकारी तथा पोलिस उपनिरीक्षक श्री. व्ही.एस. मते हे उपस्थित राहिले व त्यांनी वाचावे क्र. ५ अन्वये लेखी अभिवेदन सादर केले. मे. पेस्ट कंट्रोल (इंडिया) प्रा.लि. चे असिस्टंट जनरल मॅनेजर श्रीमती श्रीकला मल्लापूर व मे. पेस्ट कंट्रोल (इंडिया) प्रा.लि. चे पंढरीनाथ कृष्णा धामणकर हे सदर सुनावणीच्या दिवशी उपस्थित होते. सबब, संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक १५/०१/२०१३ रोजी ठेवण्यात आली.

0007 दिनांक १५/०१/२०१३ रोजीच्या सुनावणीस ॲड. श्री डी.एस. जोशी हे वकालतनाम्यासह मे. पेस्ट कंट्रोल (इंडिया) प्रा.लि. व कंपनीच्या वतीने उपस्थित राहिले व यापूर्वी टपालामार्फत सादर केलेले लेखी निवेदन कायम असल्याचे सांगितले. तसेच नमूद कंपनीकडून विनापरवाना सी-९ हा सॉल्वंट गेली २ ते ३ वर्षापासून वापर करीत असल्याचे सांगून केरोसीनच्या वापराकरीता उद्योग सहसंचालक यांचेकडील परवाना असल्याचे त्यांनी शिधावाटप यंत्रणेचा परवाना घेतला नसल्याचे सांगितले. तथापी, सदरचे दोन्ही परवान्याकरीता ते नव्याने अर्ज करणार असल्याचे सांगितले. सदर सुनावणीस मे. पेस्ट कंट्रोल (इंडिया) प्रा.लि. चे प्रशासकीय व्यवस्थापक तसेच सॉल्वंट परवानाधारक म्हणून उपस्थित राहिले. सदर सुनावणीस मे. पेस्ट कंट्रोल (इंडिया) प्रा.लि. चे असिस्टंट जनरल मॅनेजर श्रीमती श्रीकला मल्लापूर व मे. पेस्ट कंट्रोल (इंडिया) प्रा.लि. चे पंढरीनाथ कृष्णा धामणकर हे उपस्थित राहिले. तसेच सदर सुनावणीस मे. बुनीशा केम प्रा.लि. या कंपनीचे मार्केटिंग मॅनेजर राशी अडवाणी हे उपस्थित राहिले. तथापी, पुरावादर्शक कागदपत्रे सादर करण्यासाठी पुढील सुनावणी ठेवण्याची विनंती केली. मे. पेस्ट कंट्रोल (इंडिया) प्रा.लि. या कंपनीस आजमितीस सी-९ विक्री केल्याचे तपशिल तसेच त्यांच्या कंपनीने कोणाकडून साठा खरेदी केला याचे बिले सादर करण्याच्या सुचना राशी अडवाणी यांना देण्यात आल्या. तसेच सदर सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी हे उपस्थित राहिले नाहीत. सबब, संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक २२/०१/२०१३ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक २२/०१/२०१३ रोजीच्या सुनावणीस मे. बुनीशा केम प्रा.लि. चे संचालक भुपेंद्र गुप्ता यांनी उपस्थित राहून यापूर्वी टपालामार्फत सादर केलेले निवेदन कायम असल्याचे सांगितले.

तद्नंतर वाचावे क्र. ७ अन्वये प्राप्त झालेल्या जप्त मुद्देमालाच्या रासायनिक पृथःकरण अहवालात, "Exhibit nos. 1 contains petroleum hydrocarbon solvent having density at 30°C 0.886 gm/ml, flash point 65°C and distillation range 179°C to 271°C and Exhibit No. 2 contains kerosene", असे नमूद केले आहे.

सबब, प्रकरण गुणवत्तेवर निर्णयास्तव राखून ठेवण्यात आले.

& DIRECTOR OF CIVIL ... HEAD OFFICE MUMBAI

युक्तीवाद :-

मे. पेस्ट कंट्रोल (इंडिया) प्रा. लि. यांचे वतीने ॲड. श्री. देवेंद्रनाथ श्रीकांत जोशी यांचे दिनांक ०७/१२/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदनात, त्याचे अशिलाला दिनांक २९/११/२०१२ रोजीच्या पत्रानुसार दिनांक ३०/११/२०१२ रोजी सुनावणी ठेवण्यात आली होती. तुमचे अधिकारी/कर्मचारी यांनी त्याच्या अशिलाच्या

अे-६/१०/११, एमआयडीसी इंडस्ट्रियल एरिया, ऑफ वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, मिरा ४०१ १०४, जिल्हा ठाणे येथील कंपनीत दिनांक ३०/११/२०१२ रोजी भेट दिली आणि त्याच्या अशिलाने विविध इन्सेटिकाईड उत्पादनासाठी खरेदी केलेल्या सॉल्वंटची तपासणी घेतली. त्याच्या अशिलाकडे आपल्या कार्यालयाने मंजूर केलेल्या अनुज्ञप्तीनुसार त्याचे अशिलास २५ किलो लिटर प्रत्येकी प्रमाणे ॲरोमॅक्स आणि एमटीओ खरेदी व साठवणूकीस परवानगी आहे. त्याकरिता मान्यताप्राप्त २ तळटाक्या आहेत. त्यांचे अशिल एमटीओ खरेदी करीत नसून मोठ्या प्रमाणात केरोसिन खरेदी करीत आहेत व त्याकरिता आवश्यक परवान्यासाठी आपल्या कार्यालयात अर्ज केला आहे. तसेच उद्योग सहसंचालक, ठाणे यांच्याकडील केरोसिन मोठ्या प्रमाणावर खरेदी करण्यासाठी परमिट/अनुज्ञप्ती प्राप्त केली आहे. घटनास्थळी उपस्थित अधिकारी/निरिक्षक यांना सदरचे परवाने दाखविल्यानंतरही त्यांनी ॲरोमॅक्स आणि केरोसिनचा साठा जप्त करुन त्याचे नमुने पृथःकरणासाठी घेतले आहेत. सदरचा साठा जप्त असल्याने किटकनाशके बनविण्याची प्रक्रिया ही पूर्णपणे ठप्प झाली असून सद्यस्थितीत सुमारे १०० कर्मचारी हे कामाअभावी बसून आहेत. त्यांच्या अशिलाने ॲरोमॅक्सची साठवणूक व विक्री करुन कोणत्याही कायद्याच्या तसेच परवानाच्या तरतूदी व अटी/शर्तींचा भंग केला नाही. केरोसिनच्या साठ्याची खरेदी व साठवणूक त्यांनी उद्योग सहसंचालक, ठाणे यांच्याकडील प्राप्त परवानाच्या अटी व शर्तीनुसार केलेली आहे. निवेदनासोबत आवश्यक कागदपत्रे, परवाने, जबाब व परवाना नुतनीकरणासाठी केलेल्या अर्जाची प्रत अवलोकनार्थ जोडण्यात आली आहे. त्यामुळे त्यांच्या अशिलाच्या फॅक्ट्रीमधील दिनांक ३०/११/२०१२ रोजी जप्त करण्यात आलेला ॲरोमॅक्स आणि केरोसिनचा साठा हा मुक्त करुन त्यांच्या अशिलाच्या ताब्यात देण्यात यावा, अशी विनंती केली आहे.

मे. पेस्ट कंट्रोल (इंडिया) प्रा.लि. चे संचालक अनिल एस. राव, संचालक नलपुर श्रीपत राव, संचालक प्रमिला चटर्जी, असिस्टंट जनरल मॅनेजर श्रीमती श्रीकला मल्लापूर व पंढरीनाथ कृष्णा धामणकर यांचे वतीने ॲड. श्री. देवेंद्रनाथ श्रीकांत जोशी यांचे दिनांक ०८/०१/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त संयुक्त निवेदनात, नोटीस प्राप्त झालेली कंपनी ही कंपनीस ॲक्ट, १९५६ अंतर्गत नोंदणीकृत असून सदरची कंपनी दहिसर चेकनाका, मिरा रोड, जिल्हा ठाणे येथे मागील काही वर्षांपासून कार्यरत आहे. त्यांच्या कंपनीकडे ॲरोमॅक्स आणि एमटीओ सॉल्वंटस् करीता दिनांक ३१/०१/२०१२ रोजी निर्गमित केलेला परवाना क्रमांक उपभोक्ता/१४३/२००७ हा दिनांक १२/०१/२०१३ पर्यंत विधिग्राह्य आहे. त्याच्या नुतनीकरणासाठी मुळ परवाना संबंधित प्राधिकरणाकडे दिनांक १३/०१२/२०१२ रोजी सादर केला आहे. तसेच दिनांक ३१/१२/२०१३ पर्यंत विधिग्राह्य असलेला विस्फोटक परवाना, दिनांक ३१/१२/२०१५ पर्यंत विधिग्राह्य असलेले फॅक्ट्री लायसन्स, किटकनाशके नोंदणी प्रमाणपत्र, दिनांक ०९/०३/२००१ रोजी निर्गमित केलेला सॉल्वंट परवाना आहे. त्यांच्या कंपनीने दिनांक १४/१२/२०१२ रोजी

इंडस्ट्रियल व्हॉईट केरोसिनच्या खरेदी व साठवणूकीचा परवाना मिळण्यासाठी अर्ज केला आहे. याव्यातिरिक्त त्यांच्या कंपनीकडे उद्योग सहसंचालक यांच्याकडील केरोसिनच्या खरेदी, साठवणूक व वापर करिता परवाना प्राप्त आहे. नोटीसमधील अनुक्रमांक १ ते ३, ५ व ६ मधील नमुद व्यक्ती हे मे. पेस्ट कंट्रोल (इंडिया) प्रा.लि. या कंपनीशी संबंधित आहेत. त्यांनी जाणीवपूर्वक अथवा दुर्भावपूर्वक दृष्टीकोणातून कोणत्याही नियमाचा भंग केलेला नाही. कंपनीच्या साठापुस्तकात दिनांक १०/११/२०१२ नंतर आणि दिनांक २७/११/२०१२ नंतर सी-९ आणि अॅरोमॅक्स या साठ्याची आवक झाली नसल्याने साठापुस्तकात नोंद केलेली नाही. तपासणीच्या दिवशी त्यांच्या कंपनीतील दोन तळटाक्यांचा प्लॅन हा कंपनीच्या गोरेगांव येथील नोंदणीकृत असल्याने ते सादर करु शकले नाहीत. कंपनीने दिनांक १०/०९/२००६ रोजी अॅरोमॅक्स आणि सफेद केरोसिनच्या परवानाच्या नुतनीकरणाकरिता अर्ज केला आहे. तद्नंतर त्यांच्या परवान्यावर केवळ अॅरोमॅक्सची नोंद आहे. त्यामुळे त्यांचा केरोसिनचा परवाना हा रद्द केला असल्यास त्याबाबत त्यांच्या कंपनीस अवगत केलेले नाही. महाराष्ट्र फ्रिसेल केरोसिन डिलर्स अॅण्ड रिसेलर्स (लायसंन्सींग) ऑर्डर, २००५ हे आदेश प्राथमिकरित्या केरोसिनच्या खरेदी आणि विक्रीकरिता असून केरोसिनच्या वापराकरिता उद्योग सहसंचालक यांचेकडील परवाना निर्गमित करण्यात येत आहे. त्यामुळे याव्यतिरिक्त केरोसिनच्या प्रत्यक्ष वापराकरिता परवान्याची गरज नाही. तपासणीच्या वेळी अॅरोमॅक्स, सफेद केरोसिन आणि सी-९ सॉल्वंटस्ची खरेदी बिले उपलब्ध नव्हती. ती दिनांक ०१/१२/२०१२ रोजी आपल्या कार्यालयात सादर करण्यात आली आहेत. तपासणीच्या वेळी अॅरोमॅक्स आणि अेमटीओ याकरिता १२/०१/२०१३ पर्यंत वैध असलेला परवाना पथकास उपलब्ध करुन देण्यात आला आहे. सदर परवान्याच्या नुतनीकरणाकरिता आपल्या कार्यालयात अर्ज करण्यात आला आहे. सॉल्वंट रेफिनेट अॅण्ड स्लोप (लायसंन्सींग) ऑर्डर, २००७ चे कलम ३ अन्वये सी-९ सॉल्वंट आणि हेक्झेन या सॉल्वंटची खरेदी ही विहित मर्यादेपेक्षा अधिक असल्यास त्याला परवान्याची गरज भासते. परंतू त्यांच्या कंपनीने नमुद विहित मर्यादेपक्षा कमी साठा खरेदी केला आहे. त्यांची कंपनी ही उपभोक्ता म्हणून यापूर्वीच नोंदणीकृत असतानाही आपल्या कार्यालयाकडून परवान्याची गरज असल्याचे नमूद आहे. अॅरोमॅक्सच्या साठ्याकरिता त्यांच्याकडे परवाना असल्याने सदरचा साठा हा मुक्त करणे अपेक्षित होते. तथापी, आजमितीस याबाबत त्यांच्या कंपनीस अवगत करण्यात आलेले नाही. सफेद केरोसिनच्या अनुषंगाने खरेदी बिले व त्यानुसार साठापुस्तकामधील नोंदणी यामधील दोन बिलांचा फरक असून सदर साठ्याची लिटरमध्ये रुपांतरीत करुन साठापुस्तकात नोंदणी करताना चुक झाली आहे. सदरची नोंद करताना त्या तारखेस नियमित नोंदणी करणारा कर्मचारी उपस्थित नव्हता. सदर चुकीची दुरुस्ती संगणकीय प्रतीमध्ये करण्यात आली असून ती सोबत जोडण्यात आली आहे. साठ्याच्या प्रत्यक्ष वापरानंतर नियमितरित्या साठापुस्तकात नोंदी घेतली जाते. त्यामुळे सी-९ आणि अॅरोमॅक्स या साठ्याचे

२०११पुस्तकानुसार दर्शविण्यात आलेला फरक हा बिनबुडाचा आहे. सदर प्रकरणी त्यांच्या कंपनीने शासनाची कोणत्याही प्रकारे दिशाभूल केलेली नाही. तसेच कंपनीमार्फत खरेदी करण्यात आलेला साठा हा स्वत:च्या प्रत्यक्ष वापराकरिता खरेदी करण्यात आला असून त्याची फेरविक्री केलेली नाही. त्यांची कंपनी आपल्या कार्यालयात नियमितरित्या अंतीम उपभोक्ता प्रमाणपत्र सादर करीत आहे. त्यामुळे त्यांच्या कंपनीने कोणत्याही कायद्याचा अथवा नियमांचा भंग केला नसल्याची बाब नम्रपण आपल्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे, असे नमूद केले आहे.

पोलिस निरिक्षक, काशिमिरा पोलिस ठाणे, काशिमिरा यांचे दिनांक ०८/०१/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदनात, सदर गुन्ह्याचा तपास करत असून, यातील गुन्ह्याचे वेळी हजर असलेले साक्षीदार यांचेकडे चौकशी करुन अरोपीता विरुध्द जास्तीत जास्त पुरावा उपलब्ध करुन आरोपीत यांना लवकरात लवकर अटक करुन मा. न्यायालयात हजर करणेची तजवीज ठेवली आहे. तसेच सदर गुन्ह्याचेकामी जप्त करणेत आलेला मुद्देमाल हा ज्वलनशिल असल्याने त्याची लवकरात लवकर विल्हेवाट होणेस विनंती आहे, असे नमूद केले आहे.

मे. बुनीशा केम प्रा.लि. यांचे दिनांक ०९/०१/२०१३ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदनात, आपल्या कारणे दाखवा नोटीशीस अनुसरुन अहवाल सादर करतात की, मे. पेस्ट कंट्रोल (इंडिया) लि., दहिसर ही कंपनी त्यांच्याकडून सी-९ चा साठा २/३ मे. टन परिमाणात सरासरी प्रति माह खरेदी करीत आहे. सदर विक्रीच्या नंतर संबंधित कंपनीकडून त्यांच्या कंपनीस अंतीम उपभोक्ता प्रमाणपत्र मिळत आहे. महाराष्ट्र सॉल्वंट रेफिनेट ॲण्ड स्लोप (लायसंन्सींग) ऑर्डर, २००७ मधील तरतूदीनुसार उत्पादक कंपनीचा ५० किलो लिटर प्रतिमहा पेक्षा अधिक वापर असल्यास त्यांना अंतीम उपभोक्ता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे. त्याअनुषंगाने पी.सी.आय. या कंपनीचे आवश्यकता ही विहित मर्यादेपेक्षा कमी आहे. तरी नमूद कंपनीकडून प्राप्त झालेले अंतीम उपभोक्ता प्रमाणपत्र संबंधित प्राधिकरणाकडे गरजेनुसार सादर केले आहे. पी.सी.आय. ही कंपनी नांमाकिंत असून सदर कंपनीकडून आवश्यकतेनुसार नियमाचे पालन करणे अपेक्षित आहे, असे नमूद केले आहे.

<u>निष्कर्ष</u> :-

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी/अपचारी यांचा युक्तिवाद, निवेदन, अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तुत प्रकरणी, दिनांक ३०/११/२०१२ रोजी या कार्यालयातील फिरत्या पथकातील अधिकारी/कर्मचारी यांनी पंचांसह मे. पेस्ट कंट्रोल (इंडिया) प्रा.लि., अे-६/१०/११, एम.आय.डी.सी. इंडस्ट्रीयल एरिया, वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, दहिसर चेक नाका मागे, मिरा, जिल्हा ठाणे या ठिकाणी सॉल्वंट परवाना तपासणीकरिता भेट दिली. सदर

00तपासणीत, मे. बुनीशा केम प्रा.लि. तळोजा, ता-पनवेल,जिल्हा- रायगड यांनी मे. पेस्ट कंट्रोल (इंडिया) प्रा.लि. यांना सॉल्वंट सी-९ व हेक्झीन करिता अनुज्ञप्ती घेतलेली नसताना सॉल्वंटचा पुरवठा केला असल्याचे आढळून आल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द काशिमिरा पोलिस ठाणे, काशिमिरा, जिल्हा ठाणे येथे गुन्हा नोंद क्र. II ८८/२०१२, दिनांक ०१/१२/२०१२ अन्वये गुन्हा नोंद करुन सफेद केरोसिन व ॲरोमॅक्स सदृश पदार्थाचा साठा असा मिळून एकूण ११,७२,९२५/ रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

मे. पेस्ट कंट्रोल (इंडिया) प्रा. लि. यांचे वतीने ॲड. श्री. देवेंद्रनाथ श्रीकांत जोशी यांनी केलेल्या खुलाशात, या कार्यालयात दिनांक ३०/११/२०१२ रोजी ठेवण्यात आलेल्या सुनावणीच्या अनुषंगाने या कार्यालयाच्या अधिपत्याखालील अधिकारी/कर्मचारी यांनी त्याच्या अशिलाच्या अे-६/१०/११, एमआयडीसी इंडस्ट्रियल एरिया, ऑफ वेस्टर्न एक्सप्रेस हायवे, मिरा ४०१ १०४, जिल्हा ठाणे येथील कंपनीत दिनांक ३०/११/२०१२ रोजी विविध इन्सेटिकाईड उत्पादनासाठी खरेदी केलेल्या सॉल्वंटची तपासणीकरिता भेट दिली असता, या कार्यालयाने मंजूर केलेल्या अनुज्ञप्तीनुसार त्याचे अशिलास २५ किलो लिटर प्रत्येकी प्रमाणे ॲरोमॅक्स आणि एमटीओ खरेदी व साठवणूकीस परवानगी असून त्यांचे अशिल एमटीओ खरेदी करीत नसून मोठ्या प्रमाणात केरोसिन खरेदी करीत आहेत व त्याकरिता आवश्यक परवान्यासाठी या कार्यालयात अर्ज केला असल्याचे सांगितले आहे. सफेद केरोसिनच्या मोठ्या प्रमाणावर खरेदी करण्यासाठी उद्योग सहसंचालक, ठाणे यांचेकडून परमिट/अनुज्ञप्ती प्राप्त केल्याचे व घटनास्थळी उपस्थित अधिकारी/निरिक्षक यांना सदरचे परवाने दाखविल्यानंतरही त्यांनी ॲरोमॅक्स आणि केरोसिनचा साठा जप्त केल्याचे सांगितले. त्यांच्या अशिलाने ॲरोमॅक्सची साठवणूक व विक्री करुन कोणत्याही कायद्याच्या तसेच परवानाच्या तरतूदी व अटी/शर्तीचा भंग केला नाही. केरोसिनच्या साठ्याची खरेदी व साठवणूक त्यांनी उद्योग सहसंचालक, ठाणे यांच्याकडील प्राप्त परवानाच्या अटी व शर्तीनुसार केलेली आहे. त्यामुळे त्यांच्या अशिलाच्या फॅक्ट्रीमधील दिनांक ३०/११/२०१२ रोजी जप्त करण्यात आलेला ॲरोमॅक्स आणि केरोसिनचा साठा हा मुक्त करुन त्यांच्या अशिलाच्या ताब्यात देण्यात येण्याची विनंती केली आहे.

तसेच मे. बुनीशा केम प्रा.लि. यांचे खुलाशात, मे. पेस्ट कंट्रोल (इंडिया) प्रा. लि., टहिसर ही कंपनी त्यांच्या कंपनीकडून प्रति माह २ ते ३ मे. टन परिनाणात सी-९ चा साठा सरासरी खरेदी करीत असल्याचे सांगून सदर विक्रीच्या नंतर संबंधित कंपनीकडून त्यांच्या कंपनीस अंतीम उपभोक्ता प्रमाणपत्र मिळत आहे. महाराष्ट्र सॉल्वंट रेफिनेट ॲण्ड स्लोप (लायसंन्सींग) ऑर्डर, २००७ मधील तरतूदीनुसार उत्पादक कंपनीचा ५० किलो लिटर प्रतिमहा पेक्षा अधिक वापर असल्यास त्यांना अंतीम उपभोक्ता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

0012 त्याअनुषंगाने पी.सी.आय. या कंपनीची आवश्यकता ही विहित मर्यादेपेक्षा कमी आहे. तरी नमूद कंपनीकडून प्राप्त झालेले अंतीम उपभोक्ता प्रमाणपत्र संबंधित प्राधिकरणाकडे गरजेनुसार सादर केले आहे. पी.सी.आय. ही नामांकित कंपनी असून सदर कंपनीकडून आवश्यकतेनुसार नियमाचे पालन करणे अपेक्षित आहे, असे सांगितले.

मे. पेस्ट कंट्रोल (इंडिया) प्रा. लि. या कंपनीचा किटकनाशके द्रवपदार्थ उत्पादनाचा व्यवसाय असून सदर उत्पादनाकरिता नमूद कंपनीस या कार्यालयाकडून ॲरोमॅक्स व एमटीओ या सॉल्वंट पदार्थाच्या प्रत्येकी २५ किलो लिटर प्रतिमहा संपादन, साठवण व वापर करण्यास अनुज्ञप्ती क्र. उपभोक्ता/१४३/२००७ अन्वये निर्गमित करण्यात आले असून सदरची अनुज्ञप्ती दिनांक १२/०१/२०१३ पर्यंत विधिग्राह्य होती. सदर गुन्हा नोंद प्रकरणी, घटनास्थळी फिरते पथकाने पंचांसह सदर कंपनीस भेट दिली असता, श्रीमती श्रीकला मल्लापुर, असीस्टंट जनरल मॅनेजर यांनी पंचांसमक्ष दिलेल्या जबाबात, किटकनाशके बनविण्याकरिता सी-९ व ॲरोमॅक्स या सॉल्वंट पदार्थाचा वापर करण्यात येत असल्याचे सांगून ॲरोमॅक्स हे पदार्थ मे. गंगा रसायनी प्रा.लि. अंकलेश्वर, गुजरात तसेच सी-९ व हेक्झीन हे मे. बुनिशा केम प्रा.लि. तळोजा, पनवेल या कंपनीकडून खरेदी करीत असल्याचे सांगितले. तद्नंतर पथकाने कंपनीतील साठा नोंदवही व संगणकीय तक्ता तपासला असता, दिनांक १०.११.२०१२ अखेर ३० लिटर्स सॉल्वंट सी-९ व दिनांक २७.११.२०१२ अखेर १३०८० लिटर्स ॲरोमॅक्सचा साठा शिल्लक असल्याची नोंद आढळली. परंतू साठापुस्तकात दिनांक १०.११.२०१२ नंतर सी-९ सॉल्वंटच्या नोंदी व दिनांक २७.११.२०१२ नंतर ॲरोमॅक्सच्या नोंदी नियमित घेण्यात आल्याचे आढळून आले नाही. तथापी, पथकाने प्रत्यक्ष साठ्याची मोजदाद केली असता, सी-९ या सॉल्वंट पदार्थाचा साठा निरंक आढळला व ॲरोमॅक्स या सॉल्वंट पदार्थाचा साठा १२२८५ लिटर तसेच या व्यतिरिक्त सफेद केरोसिनचा २३४० लिटर प्रत्यक्ष साठा आढळून आला. म्हणजेच साठापुस्तकापेक्षा सी-९ चा साठा हा ३० लिटर तसेच ॲरोमॅक्सचा साठा हा ७९५ लिटर कमी आढळून आला आहे.

महाराष्ट्र सॉल्वंट, रॅफिनेट व स्लॉप (अनुज्ञापन) आदेश, २००७ या आदेशाचे,

कलम २ (डी) अन्वये "उपभोक्ता" याचा अर्थ जी व्यक्ती सॉल्वंटस्, रेफिनेट व स्लॉप यांचे संपादन, वापर आणि वापरासाठी साठवणूक करण्याकरिता या आदेशान्वये अनुज्ञप्ती प्राप्त केलेली आहे किंवा उपभोक्ता म्हणून स्वत:ची नोंदणी करुन घेतली आहे अशी व्यक्ती असा आहे, असे नमूद आहे.

कलम ३ अन्वये अनुज्ञप्तीशिवाय संपादन, साठवण, विक्री, वापर किंवा विक्रीसाठी साठवण करण्यास मनाई आहे, असे नमूद आहे.

कलम ३ (अ) अन्वये कोणतीही व्यक्ती अनुज्ञापन प्राधिकाऱ्याकडून याबाबतीत देण्यात आलेल्या अनुज्ञप्तीच्या अटी व शर्ती या अन्वये किंवा यानुसार असेल त्या व्यतिरिक्त अन्य बाबतीत, अनुसुची - एक मध्ये

समाविष्ठ असलेले सॉल्वंटस्, रेफिनेट व स्लॉप यांचे संपादन, साठवण, विक्री किंवा वापर करणार नाही. परंतू सॉल्वंटस्, रेफिनेट व स्लॉप याच्या दरमहा ५० किलो लिटर किंवा त्यापेक्षा कमी वापरासाठी आणि २० किलो लिटर व त्यापेक्षा कमी वापराकरिता साठवण करण्यासाठी अशी कोणतीही अनुज्ञप्ती आवश्यक असणार नाही आणि त्यासाठी अशी व्यक्ती या आदेशाच्या तरतुदींन्वये अनुज्ञापन प्राधिकाऱ्याकडे प्रथमत: स्वत:ची उपभोक्ता नोंदणी करुन घेईल, असे नमूद आहे.

<u>कलम ३ (ब)</u> नुसार कोणतीही व्यक्ती तिने सॉल्वंटस्, रॅफिनेट व स्लॉप यांचे संपादन, साठवण, विक्री, वापर किंवा विक्रीसाठी साठवण करण्यासाठी या आदेशान्वये अनुज्ञप्ती प्राप्त केलेली असल्याखेरीज अनुसुची १ मध्ये समाविष्ठ असलेले सॉल्वंटस्, रेफिनेट व स्लॉप याची अन्य राज्यातून किंवा देशातून महाराष्ट्र राज्यात आयात करणार नाही, असे नमूद आहे.

मे. बुनीशा केम प्रा.लि. या कंपनीकडून दिनांक २५.०७.२०११ रोजी १०३२ लिटर्स, दिनांक २९.०८.२०११ रोजी १७२० लिटर्स, दिनांक ०३.०९.२०११ रोजी १७२० लिटर्स, दिनांक १७.१०..२०११ रोजी २५८० लिटर्स, दिनांक १०.११.२०११ रोजी २५८० लिटर्स, दिनांक १०.०१.२०१२ रोजी १७२० लिटर्स, दिनांक २५.०१.२०१२ रोजी १७२० लिटर्स, दिनांक २८.०३.२०१२ रोजी १७२० लिटर्स, दिनांक १०.०४.२०१२ रोजी १७२० लिटर्स, दिनांक २६.०४.२०१२ रोजी १७२० लिटर्स, दिनांक ०२.०७.२०१२ रोजी १०३० लिटर्स, दिनांक ०७.०७.२०१२ रोजी २२३६ लिटर्स, दिनांक ०९.०८.२०१२ रोजी १२०४ लिटर्स, दिनांक १०.०९.२०१२ रोजी १७२० लिटर्स व दिनांक १६.१०.२०१२ रोजी १७२० लिटर्स सॉल्वंट सी-९ या पदार्थाची मे. पेस्ट कंट्रोल (इंडिया) प्रा. लि. या कंपनीस विक्री केल्याचे पथकास आढळून आले आहे.

<u>महाराष्ट्र सॉल्वंट, रॅफिनेट व स्लॉप (अनुज्ञापन) आदेश, २००७</u> या आदेशाचे,

<u>कलम ३ (क)</u> अन्वये कोणतीही व्यक्ती, तेल कंपनीकडून किंवा अनुज्ञप्तीधारकाकडून असेल त्याव्यतिरिक्त सॉल्वंटस्, रेफिनेट व स्लॉप संपादन करणार नाही किंवा अनुज्ञप्तीधारक किंवा नोंदणीकृत ग्राहक यांच्या व्यतिरिक्त अन्य कोणाही व्यक्तीस सॉल्वंटस्, रॅफिनेट व स्लॉप यांची विक्री करणार नाही, असे नमूद आहे.

<u>कलम ३ (फ)</u> अन्वये कोणतीही व्यक्ती, अनुज्ञप्तीधारक, तेल कंपनी किंवा अन्य कोणीही, अनुसुची-एक मध्ये समाविष्ठ असलेले सॉल्वंटस्, रेफिनेट व स्लॉप याची अनुज्ञप्तीधारक किंवा नोंदणीकृत उपभोक्ता यांच्या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीस विक्री करणार नाही, असे नमूद आहे.

मे. पेस्ट कंट्रोल (इंडिया) प्रा. लि. या कंपनीचे असिस्टंट जनरल मॅनेजर श्रीमती मल्लापूर यांना अधिकाऱ्यांनी घटनास्थळी पंचांसमक्ष त्यांच्या कंपनीकडे सॉल्वंट सी-९ व हेक्झीन करिता परवाना आहे किंवा कसे?

0014 याबाबत चौकशी केली असता, त्यांनी सी-९ व हेक्झीन या सॉल्वंट पदार्थाच्या खरेदी, साठवणूक व वापराकरिता परवाना घेणे आवश्यक असल्याची बाब त्यांच्या कंपनीस माहित नसल्याचे सांगितले असल्याने त्यांनी या कार्यालयाची तसेच पर्यायाने शासनाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला आहे. मे. पेस्ट कंट्रोल (इंडिया) प्रा. लि. या कंपनीकडे केवळ ॲरोमॅक्स व एमटीओ या सॉल्वंट पदार्थाकरिता अनुज्ञप्ती असतानाही त्यांनी सदर अनुज्ञप्तीमध्ये रितसर सी-९ व हेक्झीन या सॉल्वंट पदार्थाची नोंद करुन न घेता, त्यांनी अनुज्ञप्तीमधील नमूद सॉल्वंटच्या पदार्थाव्यतिरिक्त अनुसुची-एक मधील इतर सॉल्वंटच्या पदार्थाची विनापरवाना खरेदी, साठवण व वापर करुन तसेच मे. बुनीशा केम प्रा.लि. या कंपनीने मे. पेस्ट कंट्रोल (इंडिया) प्रा. लि. या कंपनीकडे सी-९ या सॉल्वंट पदार्थाकरीता अनुज्ञप्ती अथवा उपभोक्ता नोंदणी प्रमाणपत्र नसतांनाही त्यांनी सदर महत्त्वाच्या बाबींची खातरजमा न करता पुरवठा करुन विक्री केल्याने नमूद दोन्ही कंपन्यांनी महाराष्ट्र सॉल्वंट, रॅफिनेट व स्लॉप (अनुज्ञापन) आदेश, २००७ या आदेशाचा भंग केल्याचे सिध्द होत आहे.

<u>कलम ११</u> अन्वये अनुज्ञप्ती देण्यास किंवा नोंदणी करण्यास किंवा त्याचे नविकरण करण्यास नकार देण्याचा अधिकार :- अनुज्ञापन प्राधिकारी, अर्जदारास त्याची बाजू मांडण्याची संधी दिल्यानंतर आणि लेखी नमूद करण्यात यावयाच्या कारणासाठी, अनुज्ञप्ती देण्यास किंवा तिचे नवीकरण करण्यास अथवा नोंदणी करण्यास अथवा नोंदणीचे नवीकरण करण्यास नकार देऊ शकेल, असे नमूद आहे.

सदर गुन्हा नोंद प्रकरणी कंपनीच्या भुमीगत टाकी व दोन ड्रममध्ये २३४० लिटर सफेद केरोसिनचा साठा हा परिपूर्ण खरेदी बिलांअभावी जप्त करण्यात आला आहे. महाराष्ट्र फ्रिसेल केरोसिन डिलर ॲण्ड रिसेलर्स (लायसन्सींग) ऑर्डर, २००५ अन्वये केरोसिन डिलर अथवा रिसेलर म्हणजेच फेरविक्रेता यांना सदर आदेशान्वये फ्रिसेल केरोसिन परवाना घेणे बंधनकारक असल्याची या कार्यालयाची धारणा आहे. मे. पेस्ट कंट्रोल (इंडिया) प्रा. लि. चे संबंधित अधिकारी यांनी घटनास्थळी सफेद केरोसिनच्या साठ्याचे खरेदी बिलांची पुर्तता करणे क्रमप्राप्त होते. तथापी, त्यांनी पथकास घटनास्थळी परिपूर्ण बिलांची पूर्तता केली नसल्याने पथकामार्फत सदर केरोसिनचा साठा हा पुढील आदेशापर्यंत जप्त करण्यात आला आहे. मे. पेस्ट कंट्रोल (इंडिया) प्रा. लि. या कंपनीने अनुज्ञप्ती शिवाय अथवा विना उपभोक्ता नोंदणी प्रमाणपत्रा अभावी सी-९ या सॉल्वंट पदार्थाच्या साठ्याची संपादन, साठवणूक व वापर केल्याने या कार्यालयाकडून दिनांक ०८/११/२०१२ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावून दिनांक ३०/११/२०१२ रोजी सुनावणी ठेवण्यात आली. सदर सुनावणीच्या वेळी सी-९ चा साठा हा अनुज्ञप्ती शिवाय संपादन व वापर केल्याचे सिध्द झाल्याने पथकामार्फत घटनास्थळी तपासणी करुन संबंधिताविरुध्द जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ अंतर्गत कायदेशिर कारवाई करण्यात आली आहे. मे. पेस्ट कंट्रोल (इंडिया) प्रा. लि. या

CONTROLLER OF RATIONING ... MU

00कंपनीने दिनांक २२/०१/२०१३ रोजी महाराष्ट्र सॉल्वंट, रॅफिनेट व स्लॉप (अनुज्ञापन) आदेश, २००७ अंतर्गत ॲरोमॅक्स, एमटीओ, सी-९ सॉल्वंटस्, हेक्झेन व एक्झॉल डी-८० या सॉल्वंट पदार्थाच्या संपादन, वापर व वापरासाठी साठवणूक करण्याकरिता सॉल्वंट उपभोक्ता अनुज्ञप्ती मिळण्याबाबत नव्याने अर्ज सादर करुन त्याअनुषंगाने नमूद कंपनीकडून अनुज्ञप्तीकरिता आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर काशिमिरा पोलिस ठाणे येथे नोंदविलेल्या गुन्ह्याच्या अनुषंगाने तसेच मा. न्यायालयीन निर्णयाच्या अधिन राहून दिनांक ०१/०७/२०१३ रोजी सॉल्वंट उपभोक्ता अनुज्ञप्ती क्रमांक : उपभोक्ता/१५१/२००७ ही दिनांक ३०/०६/२०१५ पर्यंत विधिग्राह्य असलेला सॉल्वंट परवाना निर्गमित करण्यात आला आहे. मे. पेस्ट कंट्रोल (इंडिया) प्रा. लि. या अनुज्ञप्तीधारक असलेल्या कंपनीने अनुज्ञप्तीवरील ॲरोमॅक्सच्या साठ्याव्यतिरिक्त सी-९ या सॉल्वंट पदार्थाच्या साठ्याची अनुज्ञप्तीशिवाय संपादन, साठवणूक व वापर केल्याने त्यांनी महाराष्ट्र सॉल्वंट, रॅफिनेट व स्लॉप (अनुज्ञापन) आदेश, २००७ या आदेशाचे कलम ३ चा भंग केल्याचे निष्पन्न होत आहे. सद्यस्थितीत सी-९ चा साठा हा निरंक असून उर्वरीत ॲरोमॅक्स व सफेद केरोसिनचा साठा जप्त आहे. सबब, जप्त करण्यात आलेला ॲरोमॅक्सचा संपूर्ण साठा हा त्याच्या किंमती एवढया रकमेच्या राष्ट्रीयकृत बँकेच्या हमीवर प्रस्तूत प्रकरणी नोंदविण्यात आलेल्या न्यायालयीन निर्णयाच्या अधिन राहून त्यांच्या मालकांस परत करण्याच्या तसेच सफेद केरोसिनचा साठा हा परत करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई मला जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये काशिमिरा पोलिस ठाणे, काशिमिरा, जिल्हा ठाणे येथे गुन्हा नोंद क्र. II ८८/२०१२, दिनांक ०१/१२/२०१२ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

CONTROLLER OF CIVIL SUPPLIES

## आदेश :-

१) प्रस्तूत प्रकरणी, जप्त करण्यात आलेल्या भूमीगत टाकी व एक ड्रममधील ॲरोमॅक्स सदृश पदार्थाचा १२२८५ लिटर संपूर्ण साठा हा पोलिसांनी मे. पेस्ट कंट्रोल (इंडिया) प्रा. लि. या कंपनीस सदर संपूर्ण साठ्याच्या एकुण किंमती एवढ्या रकमेच्या राष्ट्रीयकृत बँकेच्या हमीवर परत करण्यात यावा.

२) सदरची बँक गॅरंटी या प्रकरणी नोंदविण्यात आलेल्या गुन्ह्याचा न्यायालयीन निर्णय होईपर्यंत वेळोवेळी विहीत वेळेत नुतणीकरण करुन पोलिसांकडे देण्याची जबाबदारी साठा मालकाची राहील.

३) जप्त करण्यात आलेला भूमीगत टाकी व दोन ड्रमभधील सफेद केरोसीनचा २३४० लिटर संपूर्ण साठा मे. पेस्ट कंट्रोल (इंडिया) प्रा. लि. या कंपनीस परत करण्यात यावा.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) मे. पेस्ट कंट्रोल (इंडिया) प्रा.लि. चे संचालक अनिल एस. राव
२) मे. पेस्ट कंट्रोल (इंडिया) प्रा.लि. चे संचालक नलपुर श्रीपत राव
३) मे. पेस्ट कंट्रोल (इंडिया) प्रा.लि. चे संचालक प्रमिला चटर्जी
४) मे. बुनीशा केम प्रा.लि. तळोजा ता-पनवेलचे संचालक
५) मे. पेस्ट कंट्रोल (इंडिया) प्रा.लि. चे असिस्टंट जनरल मॅनेजर श्रीमती श्रीकला मल्लापूर
६) मे. पेस्ट कंट्रोल (इंडिया) प्रा.लि. चे पंढरीनाथ कृष्णा धामणकर
(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, काशिमिरा पोलिस ठाणे, काशिमिरा, जिल्हा ठाणे यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, काशिमिरा पोलिस ठाणे, काशिमिरा, जिल्हा ठाणे यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.
२) कार्यासन अधिकारी, दक्षता शाखा, का.क्र. ५, प्रधान कार्यालय, मुंबई यांना माहितीस्तव.
३) कार्यासन अधिकारी, सॉल्वंट शाखा, का.क्र. ५, प्रधान कार्यालय, मुंबई यांना माहितीस्तव.
४) निवड नस्ती.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES HEAD OFFICE MUMBAI

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.